21 FEB 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रपती सुवर्णपदक सत्यजित पाटील याला जाहीर

## साक्षी गावडेला कुलपती पदक : शिवाजी विद्यापीठ दीक्षांत सोहळा शुक्रवारी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठातर्फे विविध कौशल्यांसाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये देण्यात येणारे महामहीम राष्ट्रपती सुवर्णपदक राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाड येथील पदार्थ विज्ञान द्वितीय वर्षात शिकणाऱ्या सत्यजित संजय पाटील या विद्यार्थ्याला देण्यात येणार आहे, तर कुलपती पदक एम. ए. विभागात सामाजिकशास्त्र विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या साक्षी शिवाजी गावडे या विद्यार्थिनीस बहाल केला जाणार आहे. शुक्रवारी विद्यापीठ प्रांगणात होणाऱ्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते या पदक विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. भीमराया मेत्री

- एकूण स्नातक : ४८५१५
- प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र घेणारे स्नातक : २४,८७५
- मुलींची संख्या : १२,८७०
- यापैकी मुलांची संख्या : १२,००५
- पोस्टाने पदवी प्रमाणपत्र घेणारे स्नातक : २३,६४०
- पीएच.डी. पदवीप्राप्त स्नातक : २५८
- पारितोषिकप्राप्त विद्यार्थी : १६
- विद्यापीठ प्रांगणात देण्यात येणारी पदवी प्रमाणपत्रे : २,७०२
- कॉलेज स्तरावर प्रत्यक्ष देण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र : २२,१७३

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन संचालक महेश काकडे, कुलसचिव विलास नांदिवडेकर उपस्थित होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी दुपारी १.३० वाजता होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलपती महामहीम राज्यपाल विद्यासागर राव, तर प्रमुख उपस्थिती इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांची असणार आहे.

यावेळी महेश काकडे म्हणाले, या वर्षीच्या दीक्षांत समारंभामध्ये एकूण ४८ हजार ५१५ स्नातकांना पदवी देण्यात येणार आहे. त्यामध्ये २५८ स्नातकांना पीएच.डी. पदवी दिली जाणार आहे. विद्यापीठ प्रांगणामध्ये २७०२ स्नातकांना पदवीचे वाटप करण्यात येणार आहे.

व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपती व कुलपती पदक विजेते, १६ विविध पारितोषिके आणि ४० पीएच.डी.प्राप्त स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे. दरम्यान, गुरुवारी सकाळी १० वाजता लोककला केंद्र येथे ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार असून, पुढील दोन दिवस हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी खुला राहणार आहे, तर शुक्रवारी दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडी पालखी सोहळ्याचा शुभारंभ कमला कॉलेज परिसरातून करण्यात येणार आहे.

### महाविद्यालयीन स्तरावर पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठातील अधिविभागातील पदवीधर विद्यार्थ्यांव्यतिरिक्त महाविद्यालय स्तरावरील पदवी प्रमाणपत्रांचे वितरण कॉलेजमध्येच करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दीक्षांत कार्यक्रमापासून १ महिन्यात कॉलेजमधील पदवी प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम सरकारच्या प्रतिष्ठित पुरस्कारप्राप्त किंवा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांच्या हस्ते करायचा आहे. यासाठी विद्यापीठातर्फे प्रत्येक कॉलेजला १० हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी नियमावली निश्चित करण्यात आली असून, ही नियमावली महाविद्यालय व्यवस्थापनाला पाठवण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

### मटेरियल सायन्समध्ये संशोधन करणार : सत्यजित पाटील



भविष्यात मटेरिअल सायन्स विषयात पीएच.डी. पदवी घेऊन संशोधनासह अध्यापन क्षेत्रात करिअर करायचे आहे, असे राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या सत्यजित पाटील याने व्यक्त केले आहे. सत्यजित म्हणाला, बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये पूर्ण केले. बी. एस्सी.च्या दुसऱ्या वर्षात शिकत असताना प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या टीममध्ये संशोधक विद्यार्थी म्हणूनही सहभाग दिला.

### वाढत्या आत्महत्यांवर अभ्यास करणार : साक्षी गावडे



शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पालकांनी रागावले म्हणून आत्महत्या करणाऱ्या मुलांची मानसिकता या विषयामध्ये संशोधन करून त्यामागची कारणे शोधणार आहे, असे मत कुलपती पदक विजेती मानसशास्त्र विषयात एम.ए. पदवी संपादन केलेल्या साक्षी शिवाजी गावडे हिने व्यक्त केले आहे.

लोकमत

## उद्या ग्रंथदिंडी : शिवाजी विद्यापीठातील तयारीला वेग; यंदा नव्या स्वरुपानुसार समारंभ

# दीक्षान्त समारंभानिमित्त आजपासून ग्रंथमहोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आज, गुरुवारपासून विद्यापीठात दोनदिवसीय ग्रंथमहोत्सव होणार आहे. ग्रंथदिंडी पालखी महोत्सव शुक्रवारी होणार आहे. या समारंभाची विद्यापीठात वेगाने तयारी सुरु आहे.

**विद्यापीठातील लोककला केंद्रासमोर ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता होईल. या महोत्सवात ५० हून अधिक स्टॉल असणार आहेत. ग्रंथदिंडी शुक्रवारी सकाळी आठ ते साडेनऊदरम्यान निघणार आहे.** यावर्षी दीक्षान्त समारंभादिवशी विद्यापीठ प्रांगणात अधिविभागातील १७९० आणि दूरशिक्षण केंद्रातील ९१२ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ४० पीएच. डी. पदवी आणि १६ अधिविभागांतील पारितोषिकांचे वितरण केले जाणार आहे. विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत महाविद्यालयांनी 'ग्रॅज्युएशन डे सेरेमनी' आयोजित करावयाचा असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले. दरम्यान, ग्रंथमहोत्सव, पदवी वितरण स्टॉलची उभारणी, पार्किंगची व्यवस्था, आदी स्वरुपांतील तयारी विद्यापीठात बुधवारी वेगाने सुरु होती.

नसीर अत्तार



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त विद्यापीठ परिसरात संलग्नित महाविद्यालयांचे ध्वज लावण्याचे काम बुधवारी सुरु होते.

## पदवी वितरणासाठी १० स्टॉलची व्यवस्था

विद्यापीठाच्या अधिविभागातील पदवी प्रमाणपत्रांच्या वितरणासाठी लोककला केंद्राच्या परिसरात दहा स्टॉल असतील. महाविद्यालयांतील पदवी प्रमाणांचे वितरण दूरशिक्षण केंद्रामध्ये होईल.समारंभाच्या नव्या स्वरुपाबाबतची माहिती स्नातकांना आतापर्यंत दोनवेळा 'एसएमएस'द्वारे कळविण्यात आली आहे. गेल्यावर्षी रेल्वे मेल सर्व्हिसद्वारे स्नातकांना पदव्या पोहोचविण्यात आल्या. त्यामध्ये पैसे आणि वेळेची बचत झाली. 'ग्रॅज्युएशन डे'साठी संलग्नित प्रत्येक महाविद्यालयाला दहा हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान दिले जाणार असल्याचे काकडे यांनी सांगितले.

### दीक्षान्त समारंभाची यावर्षीची आकडेवारी

- विद्यापीठ प्रांगणात प्रदान केल्या जाणाऱ्या पदव्या : २७०२
- महाविद्यालयाद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या पदव्या : २२१७३
- पोस्टाद्वारे पाठविण्यात येणाऱ्या पदव्या : २३६४०

### विद्याशाखानिहाय पदव्यांची संख्या

- विज्ञान व तंत्रज्ञान : २५२३०
- वाणिज्य व व्यवस्थापन : ११०३
- मानव्यशास्त्र : १२२२१
- आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम : १०७१

पुढारी

# विद्यापीठाचा उद्या दीक्षान्त सोहळा

## राज्यपाल सी. विद्यासागर राव, आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त सोहळा शुक्रवारी (दि. २२) विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दुपारी १.३० वाजता होणार आहे. भारतीय प्रबंध संस्थान (आय.आय.एम.) तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराया मेत्री प्रमुख पाहुणे असतील. राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी सर्वसाधारण गुणवत्तेसाठीचे राष्ट्रपतींचे पदक विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील सत्यजित पाटील व कुलपतींचे पदक साक्षी गावडे हिला जाहीर केले.


दीक्षान्त समारंभात ४८,५१५ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येणार आहे. यात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २४,८७५ व अनुपस्थित राहून पदवी घेणारे २३,६४० विद्यार्थी आहेत. समारंभात विविध विषयांमध्ये संशोधन अभ्यासक्रम पूर्ण करून पीएच.डी. पदवीप्राप्त स्नातकांची संख्या २५८ आहे. त्यापैकी पीएच.डी.(४०), राष्ट्रपती व कुलपती पदक (२) व १६ अधिविभागातील पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पदवी प्रदान करण्यात येणार आहेत. दीक्षान्त समारंभात ३९ अधिविभाग, दूरशिक्षण केंद्राचे असे २७०२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहेत. यासाठी विद्यापीठ परिसरात दहा स्टॉल लावण्यात येणार आहेत.

शासन परिनियमानुसार यावर्षीपासून महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ घेण्यात येणार आहे. त्याबाबतची नियमावली महाविद्यालयांना देण्यात आली आहे. महाविद्यालयांना शुक्रवारी दूरशिक्षण केंद्रात त्या-त्या महाविद्यालयांची पदवी प्रमाणपत्रे सकाळी ८ ते १ यावेळेत वाटप केली जाणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

शुक्रवारी सकाळी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. गुरुवारी (दि. २१) सकाळी साडेदहा वाजता लोककला केंद्रासमोरील मंडपात ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

### डॉ. भीमराया मेत्री यांचा अल्प परिचय...



डॉ. भीमराया मेत्री मूळचे सांगली जिल्ह्यातील अंकलगी (ता. जत) गावचे आहेत. त्यांनी कराड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्यशास्त्र विषयाची पदवी घेतली आहे. त्यानंतर आयआयटी पवई (मुंबई) येथून पीएचडी पदवी प्राप्त केली. ते शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. सध्या डॉ. मेत्री भारतीय मानक प्राधिकरणाच्या (बी.आय.एस.) मनुष्यबळ व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन (नवी दिल्ली)च्या अभ्यास मंडळाचे चेअरमन आहेत. डॉ. मेत्री हे अमेरिकेतील ह्युस्टन, टेक्सास येथील डिसिजन सायन्स इन्स्टिट्यूट (डीएसआय) च्या एशिया-पॅसिफिक विभागाचे पहिले भारतीय उपाध्यक्ष आहेत. त्यांना एआयएमए-केवल नोहरिया पुरस्कार, आशिया पॅसिफिक डिसिशन सायन्सेस इन्स्टिट्यूटचा डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस पुरस्कार मिळाला आहे.

### प्रशासनाकडून पाहणी

दीक्षान्त समारंभ पार्श्वभूमीवर भव्य मंडप उभारला असून रस्ते स्वच्छता, मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची रंगरंगोटी करण्यात आली आहे. पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. बुधवारी जिल्हाधिकारी दौलत देसाई, अपर पोलिस अधीक्षक तिरुपती काकडे यांच्यासह कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तयारीची पाहणी केली.

# २४,८७५ स्नातक घेणार पदवी



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. भीमराया मेत्री

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (ता. २२) होत असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट आयआयएम, तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराया मेत्री उपस्थित राहणार आहेत. दीक्षान्त सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव भूषविणार आहेत. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दुपारी २.०० वाजता हा समारंभ होईल.

दीक्षान्त सोहळ्यात सर्वसाधारण गुणवत्तेसाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील सत्यजित संजय पाटील ठरला. तर कुलपती पदकासाठी महावीर महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी शिवाजी गावडे हिची निवड करण्यात आली, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे आदी उपस्थित होते.

यंदा एकूण ४८५१५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. यामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २४ हजार ८७५ असून पोस्टद्वारे पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २३ हजार ६४० इतकी आहे. यावर्षी नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठातील ३९ अधिविभागातील २७०२ विद्यार्थ्यांसह पीएच.डी., एम. फील., पदवीधर व अधिविभागातंर्गत पारितोषिकप्रदान अशा एकूण ५८ विद्यार्थ्यांना डॉ. मेत्री यांच्या हस्ते पदवीप्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. यंदा पदवीधर स्नातकांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे. यावर्षी पीएच. डी. पदवी प्राप्त केलेल्या स्नातकांची एकूण संख्या २५८ असून त्यापैकी ४० स्नातकांना व्यासपीठावर पदवीप्रदान करण्यात येणार आहे. अधिविभागातंर्गत गुणवंत विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पदवी देण्यात येणार आहे.

दरम्यान, दीक्षान्त कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी (ता. २१) सकाळी ११ वाजता लोककला केंद्रात ग्रंथमहोत्सवाचे उदघाटन करण्यात येणार आहे. तर २२ रोजी सकाळी ८ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे.

## १० हजारांचे सानुग्रह अनुदान

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठातील अधिविभागातील पदवीधर विद्यार्थ्यांव्यक्तिरिक्त कॉलेजस्तरावरील पदवी प्रमाणपत्रांचे वितरण कॉलेजमध्येच करण्याबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. दीक्षान्त कार्यक्रमापासून एक महिन्यात कॉलेजमधील पदवीप्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम सरकारच्या प्रतिष्ठीत पुरस्कारप्राप्त किंवा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांच्या हस्ते करायचा आहे. यासाठी विद्यापीठातर्फे प्रत्येक कॉलेजला १० हजार रूपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी नियमावली निश्चित करण्यात आली असून ही नियमावली महाविद्यालय व्यवस्थापनाला पाठवण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

## शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ उद्या

| | |
|---|---|
| एकूण स्नातक | ४८५१५ |
| प्रत्यक्ष पदवीप्रमाणपत्र घेणारे स्नातक | २४८७५ |
| ■ यापैकी मुलींची संख्या | १२८७० |
| ■ यापैकी मुलांची संख्या | १२००५ |
| पोस्टाने पदवीप्रमाण घेणारे स्नातक | २३६४० |
| ■ यापैकी मुलींची संख्या | १३२५६ |
| ■ यापैकी मुलांची संख्या | १०३८४ |
| सायन्स व टेक्नॉलॉजी विभागातील स्नातक | २५३२० |
| कॉमर्स व मॅनेजमेंट विभागातील स्नातक | ९९०३ |
| मानव्यशास्त्र विभागातील स्नातक | १२२२१ |
| आंतरविद्याशाखा विभागातील स्नातक | १०७१ |
| पीएच. डी. पदवीप्राप्त स्नातक | २५८ |
| अधिविभागांतर्गत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी | १६ |
| विद्यापीठ प्रांगणात देण्यात येणारी पदवीप्रमाणपत्रे | २७०२ |
| दूरशिक्षणमधील पदवीप्रमाणे | ९१२ |
| कॉलेजस्तरावर प्रत्यक्ष देण्यात येणारे पदवीप्रमाणपत्रे | २२१७३ |

लोकमत

## दीक्षांत समारंभात उद्या वितरण : यंदा ४८ हजार स्नातकांना मिळणार पदवी

# सत्यजित पाटीलला 'सुवर्णपदक' साक्षी गावडेला 'कुलपतीपदक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील सत्यजित संजय पाटील ठरला. पुलाची शिरोली (ता. करवीर) येथील साक्षी शिवाजी गावडे हिने कुलपतीपदक मिळविले. यावर्षी ४८,५१५ स्नातकांना पदवीप्रमाणपत्रे प्रदान केली जाणार असल्याची माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि. २२) दुपारी दीड वाजता लोककला केंद्रात होणार आहे. अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. विद्यासागर राव, तर तिरुचिरापल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भीमराया मेत्री प्रमुख उपस्थित असणार आहेत.

### दोन वर्षांच्या तयारीचे फळ

राष्ट्रपतीपदक मिळविण्याचे ध्येय बाळगले होते.



त्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून केलेल्या तयारीचे फळ आज मिळाल्याचा खूप आनंद होत आहे. मटेरिअल सायन्समध्ये पीएच. डी. मिळवून अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात करिअर करणार असल्याची प्रतिक्रिया सत्यजित पाटील याने व्यक्त केली. सत्यजित म्हणाला, माझे वडील बिद्री महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक आणि आई सरिता ही गृहिणी आहे. पदवीचे शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात झाले. सध्या माझे सोलर सेल क्षेत्रात संशोधन सुरु आहे.

### समुपदेशन क्षेत्रात करिअर करणार

कुलपतीपदक जाहीर झाल्याचा मोठा आनंद होत आहे.



मानसशास्त्रीय संशोधन क्षेत्रात मी करिअर करणार असल्याची प्रतिक्रिया साक्षी गावडे हिने व्यक्त केली. माझे वडील खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये मराठी विषयाचे प्राध्यापक आणि आई किरण ही गृहिणी आहे. कमला कॉलेजमधून पदवी, तर महावीर महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केले. सामाजिकशास्त्र विषयात पीएच. डी. करुन मानसशास्त्रीय संशोधन क्षेत्रात मला करिअर करायचे आहे. शेतकऱ्यांची आत्महत्या, तरुणाईच्या आत्महत्या रोखण्यासाठी समुपदेशक म्हणून काम करायचे आहे.

विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला सत्यजित पाटील हा भौतिकशास्त्र अधिविभागात एम. एस्सी. द्वितीय वर्षात शिकत आहे. एम. ए. अभ्यासक्रमात सामाजिकशास्त्र विषयामध्ये सर्वाधिक गुणांसह 'कुलपती पदक' पटकविणारी साक्षी गावडे ही मानसशास्त्र विषयातील एम. ए. पदवीधारक आहे. दीक्षान्त समारंभानिमित्त ग्रंथमहोत्सव आणि ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे. शासन परिनियमानुसार यावर्षी विद्यापीठातील अधिविभागांतील स्नातक, पीएच. डी.धारकांना दीक्षान्त समारंभात पदवी प्रदान केली जाणार आहे. त्यांची संख्या २७०२ इतकी आहे.

महाविद्यालयातील स्नातकांना 'ग्रॅज्युएशन डे सेरेमनी' (पदवी प्रदान सोहळा)च्या माध्यमातून पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यंदा पदवी प्रदान केल्या जाणाऱ्या स्नातकांमध्ये विद्यार्थिनी आघाडीवर आहेत. त्यांची संख्या २६०३६ इतकी आहे. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 3 Feb 21, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

# राष्ट्रपती, कुलपती पदकावर 'कोल्हापूर'ची मोहोर

## सत्यजित पाटील, साक्षी गावडे मानकरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दीक्षान्त समारंभाचे सर्वसाधारण गुणवत्तेसाठीचे राष्ट्रपतींचे पदक पदार्थविज्ञान विभागातील सत्यजित संजय पाटील यास तर कुलपतींचे पदक महावीर महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी शिवाजी गावडे हिला जाहीर करण्यात आले. राष्ट्रपती व कुलपती पदावर कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची 'मोहोर' उमटविली आहे.

सत्यजित पाटील अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील असून तो एमएस्सी द्वितीय वर्षात शिकत आहे. त्याचे वडील दूधसागर महाविद्यालयात प्राध्यापक असून आई गृहिणी आहे. सत्यजितने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विवेक वाहिनीत नेतृत्व केले. जून २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जर्नल ऑफ सॉलिड स्टेट इलेक्ट्रो केमिस्ट्री' हा शोधनिबंध प्रकाशित झाला. आविष्कार संशोधन महोत्सवात जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे. राष्ट्रपतींचे पदक मिळाल्याचा खूप आनंद आहे. यापुढे संशोधन व अध्यापन क्षेत्रात कार्यरत राहणार असल्याचे त्याने सांगितले.



सत्यजित पाटील



साक्षी गावडे

साक्षी गावडे शिरोली पुलाची (ता. हातकणंगले) येथील असून महावीर महाविद्यालयातून तिने मानसशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी मिळविली आहे. वडील बाळासाहेब खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राध्यापक असून आई गृहिणी आहे. पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण गावातच घेतले. इस्लामपूर येथील मानसशास्त्र संशोधन परिषदेत सादर केलेल्या शोधनिबंधास पहिला क्रमांक मिळाला आहे. मिळालेले कुलपती पदक हे गुरू, आई-वडील यांचा सन्मान आहे. समाजातील अनेक घटकांना मानसशास्त्रीय समस्या आहेत. आत्महत्या करणारे शेतकरी आणि विद्यार्थी यांचे समुपदेशन करण्याचे काम करणार आहे. मानसशास्त्र विषयात संशोधन करणार असल्याचे तिने सांगितले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 FEB 2019

तरुण भारत

# राष्ट्रपती सुवर्णपदकाचा सत्यजित पाटील मानकरी

## साक्षी गावडेला कुलपती सुवर्णपदक : आज ५५ दीक्षांत सोहळा



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार (२२)रोजी होणार आहे. तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भिमराया मेत्री प्रमुख पाहुणे आहेत. कुलपती तथा महामहीम राज्यपाल चे. विद्यासागर राव अध्यक्षस्थानी आहेत. यावर्षी एकूण ४८ हजार ५१५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. दुपारी १.३० वाजता प्रमुख पाहुणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील, तसेच प्राधिनिधिक स्वरूपात २१८ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रेही प्रदान करणार आहेत. राष्ट्रपती सुवर्ण पदक सत्यजित संजय पाटील तर कुलपती सुवर्ण पदक साक्षी शिवाजी गावडे यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### शाखेनुसार पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आकडेवारी

| शाखा | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी | १३२१११ | १२१०९ | २५३२० |
| कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट | ३५९० | ६३१३ | ९९०३ |
| ह्युमॅनिटीज | ५१९५ | ७०२६ | १२२२१ |
| इंटरडिसिप्लीनरी स्टुडंट्स | ३९३ | ६७८ | १०७१ |
| एकूण | २२३८९ | २६१२६ | ४८५१५ |


सत्यजित पाटील


साक्षी गावडे

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दीक्षांत समारंभाचे तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भिमराया मेत्री आहेत. जत तालुक्यातील अंकलगी गावचे सुपुत्र असून ते शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी आयटीआयमधून पीएच. डी. पदवी मिळवली आहे. शिक्षण व प्रशासकीय क्षेत्रातील २८ वर्षाचा त्यांना अनुभव आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर जवळपास १०० शोधनिबंध सादर केले आहेत. ६ पुस्तकांचे सहलेखक म्हणून लिखान केले असून आंतरराष्ट्रीय मॅगेजीनमध्ये लिखान केले आहे. तसेच अनेक शासकीय समित्यांवर ते कार्यरत आहेत. डिसिशन सायन्स इन्स्टिट्यूट(डीएसआय)यूएसए आणि सप्लाई ऑफ सप्लाई मॅनेजमेंट (आयएसएम) यूएसए सदस्य आहेत. (एशिया पॅसिफिक डिव्हिजन) डिसिशन सायन्सेस इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत.

**४८ हजार ५१५ स्नातकांना पदव्या प्रदान केल्या जाणार**

**प्रत्यक्ष पदवी घेणारे स्नातक**

मुले.............................१२००५
मुली.............................१२८७०
एकूण.............................२४८७५

**पोस्टाने पदवी घेणारे स्नातक**

मुले.............................१०३८४
मुली.............................१३२५६
एकूण.............................१३२५६

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

सकाळ

# सत्यजितला सुवर्ण; साक्षीला कुलपतींचे पदक

## उद्या ५५ वा दीक्षान्त सोहळा; डॉ. भीमराव मेत्री यांची प्रमुख उपस्थिती

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचे यावर्षीचे राष्ट्रपती सुवर्णपदक पदार्थविज्ञान विभागाचा विद्यार्थी सत्यजित संजय पाटील (अर्जुनवाडा) याला, तर कुलपती पदक महावीर महाविद्यालयातील साक्षी शिवाजी गावडे (पुलाची शिरोली) यांना जाहीर झाले. दोघांसह ५८ जणांना व्यासपीठावर पदवीदान होणार असल्याची माहिती आज कुलगुरू देवानंद शिंदे यांनी पत्रकार बैठकीत दिली. विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (ता. २२) शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात होणार



आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तिरुचिरापल्लीचे संचालक डॉ. भीमराव मेत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत व कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे.

३९ अधिविभागांतील दोन हजार स्नातकांना १० स्टॉलद्वारे विद्यापीठाच्या प्रांगणात पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल. शुक्रवारी सकाळी आठला ग्रंथदिंडीने





सत्यजित पाटील साक्षी गावडे

दीक्षान्त सोहळ्याचा प्रारंभ होणार आहे. उद्या (ता. २१) सकाळी दहाला ग्रंथ महोत्सवाचे उद्‍घाटन लोककला केंद्रासमोर मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे असलेले डॉ. भीमराया मेत्री शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. विद्यापीठासाठी ही गौरवाची बाब असल्याचे या वेळी कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले. प्रकुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव प्रा. डॉ. विलास नांदवडेकर, संचालक महेश काकडे, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर उपस्थित होते.

### पदवी प्रमाणपत्रे महाविद्यालयांकडे

पदवी प्रमाणपत्रे संबंधित महाविद्यालयांत प्रदान करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मात्र, यंदाच्या दीक्षान्त समारंभासाठी ऑगस्टमध्ये नोंदणी केली होती. त्यानंतर हा आदेश आल्याने संबंधित महाविद्यालयांना प्रमाणपत्रे मिळावीत यासाठी विशेष सोय केली आहे. दूरशिक्षण विभागाच्या परिसरात वितरण होणार आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्रतिनिधीकडेही प्रमाणपत्रे सुपूर्द केली जाणार आहेत.


# ग्रामीण विद्यार्थ्यांची पुरस्कारांवर मोहर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाडा येथील सत्यजित पाटील आणि पुलाची शिरोली येथील साक्षी गावडे या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात देण्यात येणाऱ्या मानाच्या पुरस्कारांवर नाव कोरले.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात घेतल्यानंतर शिक्षणासाठी कोल्हापुरात आलेल्या या द्वयींनी उच्चशिक्षणानंतर संशोधनात करिअर करणार असल्याची भावना व्यक्त केली. ग्रामीण पार्श्वभूमी असूनही यशाची झेप घेता येते याचा दाखलाच त्यांनी दिला आहे.

## मटेरियल सायन्समध्ये संशोधनाचे स्वप्न


सत्यजित पाटील

राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाडा गावातील सत्यजित संजय पाटील हे नाव शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रपती पदक पुरस्कारासाठी निवडले गेले आहे. सत्यजित सध्या विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात एम. एस्सी.च्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. बिद्रीच्या दूधसाखर विद्यानिकेतनमध्ये त्याने दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. तर बी.एस्सीपर्यंतचे शिक्षण स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये पूर्ण केले. बी. एस्सी.च्या दुसऱ्या वर्षात शिकत असताना प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या टीममध्ये सत्यजित याने संशोधक विद्यार्थी म्हणूनही सहभाग दिला. 'सोलार सेल' या विषयात त्याचे सध्या संशोधन सुरू आहे. भविष्यात त्याला मटेरिअल सायन्स विषयात पीएच. डी. पदवी घेऊन संशोधनासह अध्यापनक्षेत्रात करिअर करायचे आहे. सत्यजितचे वडील बिद्री महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक असून आई सरीता गृहिणी आहेत. बहिण संयोगिता उच्चशिक्षण घेत आहे.

## आत्महत्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करणार


साक्षी गावडे

मानसशास्त्र विषयात एम.ए.पदवी संपादन केलेल्या साक्षी शिवाजी गावडे हिला यंदाचे कुलपती पदक प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. पदवीदान सोहळ्यात साक्षीला बाळासाहेब देसाई पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. साक्षी हिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिरोली हायस्कूल येथे झाले आहे. पदवीसाठी साक्षीने मानसशास्त्र विषयाची निवड केली. ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमधून तिने मानसशास्त्र विषयात पदवी घेतली. महावीर कॉलेजमधून साक्षीने एमए पदवी मिळवली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पालकांनी रागावले म्हणून आत्महत्या करणाऱ्या मुलांची मानसिकता याविषयामध्ये संशोधन करण्यात साक्षीला विशेष रस आहे. साक्षीचे वडील खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राध्यापक असून आई गृहिणी आहे.

2 1 FEB 2019 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ महोत्सवाचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून शुक्रवार दि. २२ रोजी सकाळी ८ वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे. कमला कॉलेजमध्ये ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार असून, जनता बझार, राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात सांगता होणार आहे.

## महाविद्यालयातील दीक्षांतची नियमावली जाहीर

महाविद्यालयावर दीक्षांत समारंभासाठीची नियमावली तयार केली आहे. या नियमावलीनुसार महाविद्यालयातील दीक्षांत सोहळ्याला पाहुणा कोण असावा, स्टेजवर पाहुणे कोण असावेत, अधिकार मंडळावरील एक सदस्य बोलवणे आवश्यक आहे. या सदस्याने दीक्षांतचा अहवाल विद्यापीठाला सादर करावयाचा आहे. ३० दिवसाच्या आत पदवीदान समारंभ करणे बंधनकारक, एखादा विद्यार्थी उपस्थित न राहिल्यास पोस्टाने प्रमाणपत्र पाठवणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्र परत आल्यास विद्यापीठातून विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र घेवून जावयाचे आहे. तसेच विद्यापीठातील दीक्षांत समारंभाप्रमाणेच नियम असणार आहेत.

लोकमत

डी. टी. शिर्के : केएमसी कॉलेजचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

# समृद्ध जीवनासाठी वाचन आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वाचनामुळेच आपली प्रगती साधली जाऊ शकते, त्यामुळे एक समृद्ध जीवनासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवळी होते.

डॉ. शिर्के म्हणाले, वाचनामुळे आपल्याला प्रेरणा मिळते आणि प्रेरणा आपल्याला एखादी चांगली गोष्ट करण्यास प्रवृत्त करते. आज साहित्यिक, कलावंत आणि काही राजकीय व्यक्तिमत्त्व यशाच्या उंचीवर आहेत. त्याचे कारण वाचन हेच आहे; त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचनाने आपली प्रगती करावी.




कोल्हापूर महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डॉ. ए. व्ही. पौंडमल, डॉ. सुरेश गवळी, आदी उपस्थित होते.

प्राचार्य गवळी म्हणाले, विद्यार्थ्यांनी यशस्वी झालेल्या व्यक्तिमत्त्वांची चरित्रे वाचून त्यांची प्रेरणा घ्यावी व आपली प्रगती करावी, असे आवाहन केले. प्रा. राजेंद्र कोळेकर यांनी आभार मानले. सुप्रिया माने पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी विविध क्षेत्रांत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र- जिमखाना विभागप्रमुख डॉ. ए. व्ही. पौंडमल यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2019
Times of India

# Physics student to get President's medal

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Physics student Satyajit Patil will be conferred with the President's Gold Medal for his overall excellence in the sports, cultural activities, academics and community services, during the 55th convocation ceremony of the Shivaji University, Kolhapur (SUK) on Friday.

Sakshi Gavade of Mahavir College here will be given the chancellor's award for securing the highest marks in the Master of Arts (MA) faculty.

The ceremony will be seeing science and technology graduates as top degree drawers. Of the 48,515 graduates who will receive degree certificates this year, 25,320 are science and technology graduates.

A report from the SUK said students from humanities faculty will be following with 12,221 degrees, with commerce and management faculty coming next with 9,903 degrees.

An SUK official said 22,173 degrees will be conferred in person to students from their colleges, while 23,640 will be conferred via post. Apart from that, 2,702 students will be awarded their degrees during the event. "We will be conferring degrees to 22,389 male students, and 26,126 females," the official said.